कि.फौ.अर्ज. क्र.०५/२०२४
किरण वि. अमोल
**नि.क्र. १७**

**अर्जदार क्र.१ चा अधीकचा सरतपास श्री. एम. डी. पालीवाल यांच्यातर्फे शपथेवर सुरुः–**

१. मी माझा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.१७** वर दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला मराठीत समजवून सांगितला आहे तो बरोबर आहे. लग्नाची पत्रिका अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. १८** देण्यात येते. लग्नात मिळालेल्या आंधनाची यादी दाखल आहे त्यास **नि. क्र. १९** देण्यात येते. दागिने खरेदी केल्याची पावती अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. २०** देण्यात येते. वकिलांमार्फत दिलेली नोटीस अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. २१** देण्यात येते. रजिस्टर पोस्ट पावत्या एकूण ०५ अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. २२ ते २६** देण्यात येते. पोच पावती अभिलेखावर दाखल आहे एकूण ०५ दाखल आहे त्यास **नि. क्र. २७ ते ३१** देण्यात येते. माझ्या नोटीसला गैरअर्जदाराचे उत्तर अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. ३२** देण्यात येते. अर्जदार क्र. १ व २ यांच्या आधार कार्डची प्रत अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. ३३ व ३४** देण्यात येते. ७/१२ उतारा प्रत अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. ३५** देण्यात येते. अदखलपात्र गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवालची प्रत अभिलेखावर दाखल आहे त्यास **नि. क्र. ३६** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>गैरअर्जदार विधीज्ञ यांच्या तोंडीविनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**(जी.ओ. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

**(जी.ओ. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ०२/०९/२०२५

**नि. क्र. १७ व पुढे सुरु**

**आज दि. २७/११/२०२५ अर्जदार क्र. १ चा उलटतपास गैरअर्जदार तर्फे श्री. ए. आर. ईटनकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की,नि. क्र. १९ वर तारीख नमूद नाही, तसेच कोणाच्या लग्नासंबंधात व कोठे तयार केली हे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. १९ वरील यादी खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. १९ चा माझ्या लग्नाशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. २० वर ग्राहकाने सामान नेल्याची तारीख ३०/०२/२०२२ अशी नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. २० वर जी.एस.टी क्रमांक नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. २० पावती खोटी आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ३६ या तक्रारमध्ये मी गैरअर्जदार हे पैशांची मागणी करुन मारहाण करीत होते हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पैशांची मागणी करुन शिवीगाळ करीत होते असे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. ३६ या तक्रारीचे कारण मी मुलीला औषध का देत नाही या कारणाने गैरअर्जदार क्र १ याने वाद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार हे पैशाकरिता मारहाण करीत होते शिवीगाळ करीत होते या बाबत मी लेखी तक्रार पोलिस किंवा त्याच्या वरिष्ठांना केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पैशांची मागणी करुन गैरअर्जदार शिवीगाळ करुन मारहण करित होते अशी घटना कधीच घडली नाही त्या कारणाने मी पोलिसांना तक्रार दिली नाही. माझे बँकमध्ये खाते आहे. हे म्हणणे खरे आहे की, खाते उतारा अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बँकखात्याची मी के.व्हाय.सी जोडली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे बँक खाते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या बाबत आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता माझ्या आधार कार्ड नंबरने के.व्हाय.सी. केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ३५ वर माझ्या पतीचे नाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर मालक म्हणून सहा

लोकांची नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ३५ वर पोल्ट्री फार्म असल्याबाबत नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोल्ट्री मार्फ लागणारे दस्त अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेतात कुठेही पोल्ट्री फार्म नाही त्याकारणाने त्या संबंधात दस्त दाखल केले नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यानंतर मी एकत्रित कुटुंबात राहात होती. हे म्हणणे खरे आहे की, सहा महिन्यानंतर त्याच घरात मी पतीसही वेगळी राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदत असतांना घरातील कोणतेही काम करत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी सासू काम कसे करावे हे सांगत होती तेव्हा मी त्यांच्यावर भडकून बोलत होती की मी कधी काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईवडिलांना मी एकटी मुलगी आहे . हे म्हणणे खरे नाही की, मी आईवडिलांच्या घरी काम करीत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सासरी मला काम शिकविल्या जात असता मी काम न करता मोबाईल घेऊन बसत होती. हे म्हणणे खरे नाही की, पाहूणे आले असता मी त्यांना चहा देता रागाने बेडरुममध्ये निघून जात होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वर्तणुकीबाबत माझ्या पतीने माझ्या आईवडिलांना सांगितले होते. साक्षीदार स्वतःहून सांगते की खोटी तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईवडिलांना का सांगतो या कारणावरुन मी पतीसोबत आठ–दहा दिवस बोलत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी घरचे काम न करता सकाळी १०.०० वाजेपर्यंत झोपून रहायची. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणाने माझ्या पतीला जेवनाचा डबा न घेतला उपाशी कामावर जावे लागले. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू ८–१५ दिवसांकरिता माहेरी गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या काळात मी सासऱ्यांकरिता तसेच पती व त्याच्या भावाकरिता सकाळचा जेवणाचा डबा करित नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईवडिलांना तक्रार केली असता मुलबाळ झाल्यावर दुरुस्त होईल असे म्हणून टाळत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी एकत्रित कुटुंबापासून वेगळी राहायची जिद्द करीत होती. हे

म्हणणे खरे नाही की, याच कारणावरुन मी असहाकार्याने वागत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अश्या वर्तणुकीने माझ्या सासू–सासऱ्यांनी वेगळे राहण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, वेगळे राहल्यावर सुद्धा मी पूर्वीप्रमाणे वागत होती. हे म्हणणे खरे नाही की, आई–वडिलांनी समजावून सुद्धा मी वेगळी राहूण पूर्वीपेक्षा जास्त उग्रतेने वागत होती.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी गरोदर असतांना स्वतःची काळजी न घेता आठ–आठ दिवस अंघोळ करीत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गरोदर असतांना मला तपासणीकरिता नेहमी घेऊन जात होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी प्रसूती डागा हॉस्पीटल येथे झाली. हे म्हणणे खरे आहे की, दवाखान्यात माझे पती हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, दवाखान्याचा खर्च माझ्या पतीने केला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रसूती नंतर माझ्या पतीने माहेरी आणून दिले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती माझ्या माहेरी काही दिवस राहीले व गावी परत आले. हे म्हणणे खरे नाही की, मुलीच्या नामकरणाची माहीती मी पती व सासू–सासऱ्याला दिली नाही. मी माहेरवरुन दोन महिन्यानंतर सासरी आली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीच्या वैद्यकीय तपासणीकरिता मनसर येथे घेऊन जात होते. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टरांना वेळ होत असल्यास माझे पती त्यांच्या मावशीकडे (गैरअर्जदार क्र. ५)थांबायचे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या मुलीची काळजी घेत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी मुलीला वेळ औषध देत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, या कारणाने डॉक्टर माझ्यावर रागावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या पतीच्या मावशी मुलीची काळजी घेण्याबाबत रागावली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याकारणाने मला माझ्या पतीच्या मावशीचा राग होता. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या पती पत्नीच्या वादाशी गैरअर्जदार क्र. ५ चा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. ५ ला खोटी नोटीस पाठविली. हे म्हणणे खरे नाही की, मला घरचे काम करण्याचा व मुलीची काळजी घेण्याचा कंटाळा येत होता व मी कायम मोबाईलमध्ये व्यस्त राहत होती.हे

म्हणणे खरे नाही की, मला पतीसोबत राहायचे नाही हे नेहमीच्या भांडणावरुन मी माझ्या आईवडिलांना सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, दि. २३/०५/२०२३ रोजी मला माहेरी घेऊन जाण्याबाबत आईवडिलांना फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी दाग–दागिने, नेहमीच्या वापरीच्या वस्तू व कपडे भरुन जाण्याची तयारी ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आईवडिलांना फोन केला याबाबतची माहीती पती व सासू सासरे यांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४/०५/२०२३ रोजी सासू सासरे सकाळी शेतात गेले होते मी व माझे पती असे घरी होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझे वडील, मामा गिरडकर व त्यांचा मुलगा माझ्या घरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यारोजी माझे वडील, मामा व त्यांच्या मुलाने माझ्या पतीस मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मारपीट सुरु असता सासू व माझा दीर घरी परत आहे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी सासू मध्यस्ती करीत असता माझे वडील व मामांनी सासूला थापडांनी मारहाण केली व तिच्या बांगड्या फोडल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझा लहान दीर वाचवायला गेला असता तिघांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, या मारहाणीत त्याच्या नाकावर फ्रॅक्चर झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती व दीर हे पोलीस स्टेशनला तक्रार द्यायला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती पोलीस स्टेशनला तक्रार द्यायला गेले असतांना, मी वडिलांसोबत माहेरी निघून आली. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती तक्रार द्यायला गेले असे समजल्यानंतर मी सुद्धा तक्रार द्यायला गेली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दीराला तपासणीकरिता पोलिसांनी दवाखान्यात पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या विरुद्ध कार्यवाही होईल या भितीने खोटी तक्रार द्यायला गेलो होतो.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सहा महिन्यापर्यंत मी व माझे आई वडिल माझे पती व सासू सासरे सोबत बोललो नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही चर्चा गैरअर्जदारासोबत न करता आम्ही नोटीस पाठविली आहे. हे म्हणणे

खरे नाही की, गैरअर्जदारांसोबत कोणताही समझोता करावयाचा नव्हता त्या कारणाने आम्ही नोटीस पाठविली. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे आईवडील परमात्मा एक पंथाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने महीला समुपदेशन केंद्र मौदा येथे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणाहून मला समन्स आला होता तथा फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी फोनवर सांगितले होते की कोर्टात केस टाकून पाहून घेऊ. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदत असतांना अर्जात सांगितल्याप्रमाणे कोणत्याही घटना घडल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर कोणताही घरघुती हिसांचार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, संसारी जबाबदारी पार पाडणे मला जमत नसल्याने मी षडयंत्र रचून माहेरी निघून आली. हे म्हणणे खरे नाही की, मी शिलाई कामातून १२ ते १५ हजार रुपये महीना कमाविते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जात केलेल्या मागणीप्रमाणे कोणतीही दाद मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केली व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

.

| श्रवणोत्तर स्वीकृत, | समक्ष |
|---|---|
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.11.27 17:14:31 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.11.27 17:14:36 +0530 |
| **(जी.ओ. वानखडे)** | **(जी.ओ. वानखडे)** |
| न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी | न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी |

दिनांकः २७/११/२०२५